# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २४ जून, २०२६

## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ)** तारांकित प्रश्न

**(ब)** सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : विनंती अर्ज सादर करणे -**

(१) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** : "चंद्रपूर जिल्ह्यात वाढत चाललेल्या मानव-वन्यजीव संघर्षासंदर्भात कायमस्वरूपी उपाययोजना करणे व बाधित कुटुंबांना न्याय देणे" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाला सादर करतील.

(२) **डॉ.नितिन राऊत, वि.स.स.** : "कोराडी औष्णिक वीज निर्मिती केंद्र व वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेडच्या कोळसाखाणीमुळे उत्तर नागपूर विधानसभा मतदार संघातील वाढत्या भीषण प्रदूषणावर तातडीने नियंत्रण आणणे तसेच बाधित नागरिकांना पर्यावरणीय नुकसान भरपाई (Environmental Compensation) देण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाला सादर करतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : (मंगळवार, दिनांक २३ जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, प्रशांत बंब, रमेश बोरनारे, चेतन तुपे, गोपिचंद पडळकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, राजकुमार बडोले, बबनराव लोणीकर, दिपक केसरकर, संजय बनसोडे, डॉ.संजय कुटे, डॉ.तानाजी सावंत, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री प्रविण दटके, राजेंद्र गावित, शेखर निकम, अभिमन्यु पवार, विजय शिवतारे, प्रताप पाटील-चिखलीकर, श्रीमती सीमा हिरे, श्री.राजेश क्षिरसागर, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री सुरेश धस, प्रदिप जैस्वाल, दिलीप बनकर, डॉ.अतुल भोसले, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री सत्यजित देशमुख, विलास तरे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, चंद्रदीप नरके, राजेश विटेकर,**

**संभाजी पाटील-निलंगेकर, सुनिल शेळके, चैनसुख संचेती, नरेंद्र भोंडेकर, चंद्रकांत नवघरे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री मंगेश कुडाळकर, काशिनाथ दाते, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री किशोर पाटील, सचिन पाटील, देवराव भोंगळे, शांताराम मोरे, मनोज कायंदे, रत्नाकर गुट्टे, प्रकाश सुर्वे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री किशोर जोरगेवार, निलेश राणे, संतोष दानवे, तुकाराम काते, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री अशोक पाटील, मंगेश चव्हाण, चंद्रकांत सोनवणे, सुरेश भोळे, बालाजी कल्याणकर, विक्रम पाचपुते, सुहास कांदे, राघवेंद्र पाटील, संजय गायकवाड, सुभाष देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री सुनिल कांबळे, महेंद्र थोरवे, ॲड.राहुल कुल, सर्वश्री महेंद्र दळवी, अमल महाडिक, चंद्रकांत पाटील, मनोज घोरपडे, संतोष बांगर, हरिष पिंपळे, विश्वनाथ भोईर, प्रताप अडसड, दिलीप लांडे, महेश लांडगे, महेश शिंदे, राजेश वानखडे, आमश्या पाडवी, प्रविण तायडे, हिकमत उढाण, मोहन मते, बाबुराव कदम-कोहळीकर, सिध्दार्थ शिरोळे, अमोल खताळ, नारायण कुचे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री रमेश कराड, आनंद तिडके, सुमित वानखेडे, मुरजी पटेल, समीर कुणावार, अमोल पाटील, राणाजगजितसिंह पाटील, सुहास बाबर, डॉ.सुरेश खाडे, सर्वश्री विलास भुमरे, कृष्णा खोपडे, राजेश मोरे, चरणसिंग ठाकूर, विठ्ठल लंघे, राजेश पवार, किरण सामंत, डॉ. तुषार राठोड, डॉ. अशोकराव माने, श्रीमती नमिता मुंदडा, ॲड.श्रीजया चव्हाण, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री शरद सोनावणे, राजेश पाडवी, दिलीप बोरसे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री विनोद अग्रवाल, किर्तीकुमार भांगडिया, उमेश यावलकर, अमोल जावळे, काशिराम पावरा, शिवाजी पाटील, रवी राणा, सचिन कल्याण-शेट्टी, विजय देशमुख, शंकर जगताप, राहुल आवाडे, विजय रहांगडाले, देवेंद्र कोठे, अनुपभैय्या अग्रवाल, सुधीर गाडगीळ, हेमंत रासने, श्रीमती सई डहाके, सर्वश्री राजू तोडसाम, किसन वानखेडे, संजय पुराम, भीमराव केराम, श्याम खोडे, समीर मेघे, जितेश अंतापुरकर, करण देवतळे, डॉ. मिलिंद नरोटे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"सन १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र मिळाल्यानंतर आतापर्यंत अतिवृष्टी, अनावृष्टी, विषाणूजन्य रोग इ. मुळे शेतकरी बांधव व शेतीव्यवसाय अनेकवेळा अडचणीत येणे परंतु, सन २०१४ पर्यंत तत्कालीन शासनाने राज्य शासनाच्या तिजोरीतून एकदाही कर्जमाफी न देणे, सन २०१४ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर पहिल्यांदा राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना राबवून लाखो शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा प्रयत्न करण्यात येणे, २०२०-२०२१ मध्ये तत्कालीन राज्य शासनाने महात्मा ज्योतीबा फुले कर्जमुक्ती योजना जाहिर करणे परंतु कर्जाची मर्यादा २ लाख असल्याने अधिक कर्ज घेतलेल्या शेतक-यांचा त्यात समावेश नसणे, परिणामी लाखो शेतकरी कर्जमुक्ती योजनेपासून वंचित असणे, सन २०२४ मध्ये घोषणा केल्याप्रमाणे शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहिर करणे मात्र, या योजनेमध्ये दोन लाखांवर कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचाही समावेश असणे, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी रु.५० हजार पर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची योजना समाविष्ट असणे, यासोबतच आत्महत्याग्रस्त जिल्हयातील प्रमुख पिक असलेल्या कापसाच्या उत्पादन

वाढीसाठी 'कापूस उत्पादकता मिशन' ची केंद्रे स्थापन करण्याचे प्रयोजन असणे, अल निनोनच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाच्या कामांना गती देण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांनी एप्रिल, २०२६ मध्येच घेऊन व त्यासंदर्भात बैठक घेऊन सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देणे, त्याअनुषंगाने जलयुक्त शिवार टप्पा २ च्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यामध्ये जलसंधारणाची कामे मोठया प्रमाणात करण्यात येणे, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी सर्वांचा सहभाग घेऊन लोकचळवळ उभी करण्याची आवश्यकता, राज्यात 'नमो शेतकरी महासन्मान योजना', 'कृषी समृध्दी योजना', 'महाडिबीटी एकत्रित प्रणाली', 'महिला शेतकरी व गोपालकांसाठी योजना' राबविण्यात येणे, शेतीत फवारणी, पिक निरिक्षण, किड नियंत्रण, जमिनीचे विश्लेषण इ. साठी ड्रोन व रोबोटिक्सचा वापर करण्यात येणे, हवामानातील अनियमितता, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी इ.चा सामना करता-करता शेतकऱ्यांच्या जीवनातील स्थैर्य हरवू नये याकरिता नैसर्गिक आपत्ती, किड व रोग इ. बाबींपासून विमा संरक्षण देणे व नुकसानीच्या प्रमाणात नुकसान भरपाई देणे, शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य राखणे याकरिता प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत राज्यातील अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी, उत्पादनावर आधारित सुधारित पिक विमा योजना राबविण्यात येणे, शेती क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी मोठी भांडवली गुंतवणूक करण्याचे शासनाचे प्रयोजन असणे, गोपीनाथ मुंडे अपघात अनुदान योजनेचा विस्तार करुन त्यात शेतमजुरांनाही विमा संरक्षण देण्यात येणे, 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना' राबविण्यात येणे, संपूर्ण राज्यात 'महाराष्ट्र  नैसर्गिक शेती अभियान' राबविण्यात येणे, अशाप्रकारे राज्यातील शेतकरी स्वयंपूर्ण व कर्जमुक्त होण्याच्या दृष्टीने आणि नैसर्गिक बदलाचा सामना करण्यास सक्षम होण्याच्या दृष्टीने राज्य  शासनाने घेतलेले निर्णय व त्याबाबत करावयाची उपाययोजना."

**पाच : औचित्याचे मुद्दे**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. अमीन पटेल, अस्लम शेख, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. संजय मेश्राम, रामदास मसराम, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, अमित विलासराव देशमुख, अमित झनक, साजिद खान पठाण, डॉ.नितिन राऊत, ॲड.राहूल कुल, सर्वश्री. अभिमन्यु पवार, योगेश सागर, संजय केळकर, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, मंगेश चव्हाण, भास्कर जाधव, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कोकण आणि पश्चिम घाटाला जोडणारा महत्वाचा मार्ग असलेला आंबेनळी घाट गेल्या काही वर्षात मृत्यूचा घाट बनलेला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले असणे, रायगड जिल्हयातील पोलादपूर- महाबळेश्वर मार्गावरील आंबेनळी घाटात दाभीळ गावाच्या हद्दीत १२०० फूट खोल दरीत स्कॉर्पियो कार कोसळून ८ तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना माहे मे, २०२६ मध्ये घडलेली असणे, सदरहू अपघाताची घटना

२४ तासांनी उघडकीस येणे, पोलादपूर ते महाबळेश्वर हा ४० किलोमीटरचा रस्ता अत्यंत अरुंद व तीव्र वळणाचा असणे, ४० किलोमीटर मार्गाची परिस्थिती अत्यंत दयनीय असून त्यावर असंख्य खड्डे पडले असणे, त्यातच रस्त्याला संरक्षक कठडे नसल्याने ८ वर्षात जवळपास ५० मोठे अपघात घडले असून त्यामध्ये ८० हून अधिक निष्पाप प्रवाशांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडणे, सदरहू ठिकाणचे अपघात कमी करण्यासाठी महाबळेश्वर ते सातारा रस्त्याप्रमाणे महाबळेश्वर ते पोलादपूर या मार्गाचे रुंदीकरण करणे अत्यंत आवश्यक असणे, याबाबत शासनाने अद्यापही कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे आजही हजारो प्रवाशांना जीव धोक्यात घालून आंबेनळी घाटातून प्रवास करावा लागत असणे, मृत पावलेल्या तरुणांच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत, आंबेनळी घाटात कायमस्वरूपी मजबूत क्रॅश बॅरियर्स बसविण्याबाबत तसेच राज्यातील इतर अपघातप्रवण घाटरस्त्यांवर रात्रीच्या प्रवासादरम्यान सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी व आपत्कालीन मदत यंत्रणा तैनात ठेवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. काशिनाथ दाते, सुधीर मुनगंटीवार, सुनिल प्रभू, आनंद तिडके, संजय गायकवाड, धनंजय मुंडे, प्रकाश सुर्वे, मुरजी पटेल, विक्रम पाचपुते, बबनराव यादव (लोणीकर), नारायण कुचे, रोहित पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. नानाभाऊ पटोले, अनिल पाटील, अमोल खताळ, मोहन मते, राजकुमार बडोले, राजेश क्षिरसागर, गोपिचंद पडळकर, अजय चौधरी, संजय देरकर, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. शंकर मांडेकर, अमित विलासराव देशमुख, रईस शेख, अतुल भातखळकर, अभिमन्यु पवार, योगेश सागर, मंगेश चव्हाण, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात सर्वच जिल्ह्यांमध्ये माहे मे व जून, २०२६ मध्ये अन्न औषध प्रशासन विभागाने टाकलेल्या धाडीत मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त दूध, दुग्धजन्य खाद्यपदार्थ, खाद्यतेल, पिण्याचे पाणी, पेढा, गुळ, चहा पावडर व आंबे पिकवण्याची पावडर तसेच गुटखा, तंबाखू, सुगंधी सुपारी, मावा, निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांचा कोट्यवधींचा साठा जप्त केलेला असणे, राज्यातील शासकीय रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वापरण्यात येणारे सर्जिकल ग्लोव्हज, बँडेज आणि कापूस निर्जंतुक नसल्याचे वास्तव अन्न व औषध प्रशासन (एफडीए) ने मुंबई, भिवंडी आणि पालघर येथे करण्यात आलेल्या कारवाईमध्ये आढळून येणे, यामध्ये सुमारे दोन कोटी रुपये किंमतीची वैद्यकीय उपकरणे आणि औषधसाठा जप्त करण्यात आलेला असणे, परराज्यातून येणाऱ्या विविध आयुर्वेदिक औषध विक्री आस्थापनांवर कारवाई करत सुमारे ७५ लाखाचा औषधसाठाही जप्त करणे, अशाप्रकारे नागरिकांच्या दैनंदिन जीवनात लागणाऱ्या खाद्य पदार्थांमध्ये भेसळ केल्याने आरोग्याच्या समस्या निर्माण होणे, याप्रकरणी काही नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आलेले असणे,मात्र अन्न व औषध प्रशासनाकडे अन्नातील विषारी घटक व जंतुनाशके तपासणीसाठीची अत्यावश्यक यंत्रसामग्री उपलब्ध

नसणे, अन्न व औषध प्रशासनाच्या चाचण्या या केवळ भेसळीपुरत्या मर्यादित असून विषारीपणाच्या तपासणीसाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेवर अवलंबून राहावे लागत असणे, अशा प्रयोगशाळांसाठी तज्ञांची गरज असून एफडीएमध्ये बऱ्याच जागा रिक्त असणे, नाशिक विभागात पाच जिल्हे असून त्यासाठी केवळ दोनच औषधे निरीक्षक असणे, त्यामुळे अधिकाऱ्यांना प्रभावीपणे काम करण्यात अडचणी येणे, अशा प्रकारे नागरिकांच्या जीवितास धोका पोहचवणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) सर्वश्री. मोहन मते, राजु तोडसाम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पालघरच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या तीन वर्षीय बालकाचा (आतिक आशिक खान) उपचारादरम्यान रस्त्यातच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक ९ जून, २०२६ रोजी घडली असणे, बिडको औद्योगिक वसाहतीतील भरवाडपाडा येथे खेळताना या मुलाच्या पायाला काहीतरी चावल्याचे त्याने त्याच्या आईला सांगितले असणे, त्यामुळे पालकांनी त्याला तातडीने पालघरच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले असणे, तिथे उपस्थित असलेल्या महिला डॉक्टरकडून त्याच्या पायावरील दोन जखमा पाहून इंजेक्शन आणि सलाईन लाऊन उपचार सुरू करण्यात येणे, काही वेळातच संबंधित मुलाची प्रकृती झपाट्याने खालावणे, मात्र पालघर ग्रामीण रुग्णालयात आयसीयू आणि तज्ज्ञ डॉक्टरांची सुविधा नसल्यामुळे त्याला पुढील उपचारांसाठी त्वरित अन्यत्र हलवण्याचा सल्ला देण्यात येणे, त्यानुसार पुढील रुग्णालयात उपचारासाठी घेऊन जात असतानाच रस्त्यात या मुलाचा मृत्यू होणे, आयसीयू आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या अभावी मुलाचा जीव गेल्याने त्याच्या पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला असणे, या घटनेमुळे पालघरमध्ये जिल्हा रुग्णालय आणि ट्रॉमा केअर सेंटर त्वरित सुरू करण्याबाबत नागरिकांनी केलेली आग्रही मागणी, यास्तव पालघर जिल्ह्यातील आदिवासीबहुल भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी पालघर जिल्हा रुग्णालय आणि ट्रॉमा केअर सेंटर तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**सात : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, प्रविण दटके, मोहन मते, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यात यंदाच्या उन्हाळ्यात अनेक जिल्ह्यांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून भूगर्भातील पाण्याची पातळी लक्षणीयरीत्या खालावल्याने नागरिकांसमोर पिण्याच्या पाण्याचे गंभीर संकट निर्माण होणे, अनेक गावांतील विहिरी, कूपनलिका, तलाव व लघु जलसाठे कोरडे पडल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागत असणे,

विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना व नागरिकांना दररोज अनेक किलोमीटर अंतरावरून पाणी आणण्याची वेळ आल्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनावर विपरीत परिणाम होणे, राज्यातील अनेक गावांमध्ये टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत असला तरी तो अपुरा पडत असल्यामुळे अनेक ठिकाणी पाणीपुरवठ्याबाबत तक्रारी प्राप्त होणे, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत उभारण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना अनेक ठिकाणी बंद अवस्थेत असल्यामुळे त्यांची कार्यक्षमता अत्यंत कमी असणे, परिणामी नागरिकांना सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसणे, याशिवाय धरणांमधील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असून अनेक भागांमध्ये दूषित पाण्याचा वापर करावा लागत असणे, विदर्भातील अनेक तालुक्यांमध्ये क्लोराईडयुक्त व क्षारयुक्त पाण्याची समस्या कायम असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येणे, दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा धोका वाढत असून ग्रामीण व दुर्गम भागातील परिस्थिती अधिक गंभीर असणे, पावसाच्या पाण्याचे संधारण, भूजल पुनर्भरण, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, नळ पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती व सक्षमीकरण, दूषित पाणी समस्येचे निराकरण, टँकर व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे, जलव्यवस्थापनासाठी दीर्घकालीन धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६

---------------------------------------------------------------------------------------------

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ३ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

**(ख) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील

प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(क) **विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२६

**नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक २३ जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ व २)**

(१) **श्री.रईस शेख, वि.स.स.**

"भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खालावल्याबाबत" या विषयावरील श्री. रईस शेख, वि.स.स. यांचा दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २४ मधील प्रश्न क्रमांक १९१९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

(२) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यातील शासकीय कामकाज मराठी भाषेत करणेबाबत" या विषयावरील श्री.मनोज जामसुतकर, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३१०४७ ला दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) (क्रमांक ३)**

**(३) श्री.अस्लम शेख, वि.स.स.**

"मुंबईसह कोकणातील सागरीक्षेत्रात बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या टॉलर्सवरील दंडाची रक्कम वाढविण्याबाबत" या विषयावरील श्री.अस्लम शेख व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २३२५४ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २३ जून, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.